माळी पदाचे मुलाखतीकरीता पात्र झालेल्या उमेदवारांकरीता आवश्यक सुचना

दि. २५/०९/२०२५

अ) मुलाखती करीता पात्र उमेदवारांना कळविण्यात येते की, त्यांनी या कार्यालयाद्वारे **प्रात्यक्षिक परिक्षेकरीता देण्यात आलेले प्रवेशपत्र** तसेच आपले ओळखपत्र (Photo ID)**उदा. :-** मतदार कार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड, वाहन परवाना यापैकी कोणताही एक पुरावा घेवून स्व:खर्चाने दि ०८/१०/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजता **जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथे उपस्थित राहावे.**

ब) **मुलाखतीसाठी येतांना खालील कागदपत्रांच्या स्वतः साक्षांकीत** (Self-attested) केलेल्या **छायांकित प्रतीचा एक संच व मुळ प्रती** तपासणीसाठी आणाव्यात.

१) जन्मतारखेच्या पुराव्याचा दाखला (शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र/सक्षम प्राधिकारणाने निर्गमित केलेले जन्म प्रमाणपत्र/एस.एस.सी. चे बोर्ड प्रमाणपत्र (School Leaving Certificate/Birth Certificate issued by Competent Authority/Board Certificate of SSC)

२) शैक्षणिक पात्रतेच्या परिक्षेचे गुणपत्रक, प्रमाणपत्र किंवा शाळा सोडल्याचा दाखला (४थी, १०वी, १२वी किंवा कोणत्याही मान्यता प्राप्त विद्यापीठातून घेतलेली पदवी, इत्यादी)

४) जाहिरात प्रसिद्धी नंतरची तारिख असलेले **दोन प्रतिष्ठित व्यक्तींनी** दिलेले चारित्र्य संपन्नतेविषयीचे प्रमाणपत्र.
(त्यांचा पत्ता व फोन नंबर व सही शिक्क्यासह) **(परिशिष्ट 'ब')**

५) लहान कुटूंबाबाबत स्वयं घोषणापत्र (Self Declaration) **(परिशिष्ट 'क')**

६) सक्षम अधिकाऱ्याने प्रदान केलेला जातीचा दाखला.(केवळ मागासवर्गीयांसाठी)

७) महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

८) सेवायोजन कार्यालयात नोंदणी केलेली असल्यास, नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

९) उमेदवार शासकीय कर्मचारी असल्यास, त्याच्या कार्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र.

१०) विवाहित महिला उमेदवारांच्या बाबतीत, जर तिने लग्नानंतर तिचे नाव बदलविले असेल तर तिच्या नावाच्या बदलाबाबत दस्तऐवज, उदाहरणार्थ शासकीय राजपत्र, सक्षम प्राधिकरणाने जारी केलेल्या विवाह प्रमाणपत्राची प्रत, इत्यादी.

११) आधार कार्ड

१२) संबंधीत इतर आवश्यक कागदपत्रे अर्जामध्ये दिलेल्या माहितीसह.

१३) न्यायालय प्रशासनाने मागणी केल्यास इतर कोणतेही दस्तऐवज सादर करणे अनिवार्य आहे.

क) जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा यांचे नियंत्रणाबाहेरील कोणत्याही अनपेक्षित घटनेमुळे भरती प्रक्रियेतील मुलाखतीचे वेळापत्रक बदलू शकते. असा बदल वेळोवेळी जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा यांच्या अधिकृत संकेतस्थळावर व नोटीस बोर्डवर प्रसिद्ध केला जाईल. त्याकरीता उमेदवारांनी अधिकृत संकेतस्थळास (www.wardha.dcourts.gov.in) वेळोवेळी भेट द्यावी.

ड) उमेदवाराला कोणत्याही बदलाबाबतची सूचना उशीरा मिळाल्यामुळे नियोजित तारखेस व वेळेस उमेदवार मुलाखतीस अनुपस्थित राहिल्यास, जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा प्रशासनाकडून याबाबत कोणतीही तक्रार/दावा विचारात घेतला जाणार नाही किंवा ऐकल्या जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

इ) संपर्क क्रमांक ०७१५२ २४०१५५
ई-मेल आय डी- mahwardc@mhstate.nic.in

25/9/2025

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
वर्धा